## दिन विशेष...

१५२४ : पोर्तुगीज खलाशी व भारताचा शोध लावणारा दर्यावर्दी वास्को-द-गामा यांचा मृत्यू झाला.
१८९९ : साने गुरुजी यांचा जन्मदिन.
१८१८ : शक्तीच्या अविनाशित्वाचा शोध लावणारा संशोधक जेम्स प्रिस्कॉट ज्यूल यांचा जन्म झाला.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८५,५२४.८४ -४२.६३ (०.०५०%)
डॉलर ₹ ८९.६०

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३० | १३ |
| दिल्ली | २१ | ११ |
| मुंबई | ३४ | १८ |
| नागपूर | २८ | ११ |
| पुणे | ३० | १० |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शुक्रवार, दि. २६ डिसेंबर २०२५ | वर्ष २ रे | अंक ४७ किंमत : ५ रु. | पाने ४


### सुविचार

यशस्वी होण्यासाठी आत्मशिस्त आणि नियमितता महत्त्वाची आहे.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०२ संध्या-५:५३

### सोने - चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,४०,४७५/- २,२३,०००/-

### केळी भाव

नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

# साहित्यिक घाबरले तर सक्षम भारत उभा राहणार नाही : प्रेमानंद गज्वी

## छत्रपती चौथे शिवाजी महाराज साहित्य पुरस्कार वितरण

वृत्तसंस्था। अहिल्यानगर

**समाजातील कुरुपता दूर करण्याचे काम साहित्य करते. राजकारणाने समाज कलुषित झाला आहे. छत्रपती चौथे शिवाजी महाराज या क्रांतिकारी राजाचे आदर्श समोर ठेऊन साहित्यिकांना जबाबदारीने समाजाला पुढे घेऊन जावे लागणार आहे. साहित्यिक घाबरतील, तर सक्षम भारत उभा राहू शकणार नाही, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष प्रेमानंद गज्वी यांनी केले.**

हुतात्मा छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांच्या हौतात्म्य दिनाचे औचित्य साधून जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्री शिवाजी मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडारने आज, गुरुवारी त्यांच्या नावे राज्य साहित्य पुरस्कार प्रदान कार्यक्रम आयोजित केला होता. त्यावेळी प्रेमानंद गज्वी बोलत होते. भांडारचे सभापती व संस्थेचे सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील, पदाधिकारी डॉ. विवेक भापकर, मुकेश मुळे, ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, दीपक दरे, अरुणा काळे, निर्मला काटे, कल्पना वायकर, प्रा. रवींद्र देवढे, सुरेश घुंगाडे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, प्राचार्य विजयकुमार पोकळे आदी उपस्थित होते.

प्रेमानंद गज्वी म्हणाले, सत्यासाठी काही किंमत मोजावी लागली तरी साहित्यिक व कलाकारांनी मागे हटू नये. कला कोणाची बटिक नसते, बटीक असलेली कला नसते, चांगले साहित्याला आपोआप समाज मान्यता व पुरस्कार मिळते. कलेसाठी जीवन, की जीवनासाठी कला! असे नसून ज्ञानासाठी कला असली पाहिजे. या तिसऱ्या चौकटीकडे साहित्यिकांना प्रवास करावा लागणार आहे. सत्य समोर आणणे हे लेखकाची नैतिक जबाबदारी असते, ते विसरु नये. सामाजिक प्रश्नांना जागरूक राहिले पाहिजे. ठेच लागली, वेदना झाल्या तर साहित्य निर्मिती होते. तसेच लेखकांनी इतरांच्या वेदनांशी समरूप होऊन देखील साहित्य निर्मिती




### ➤ असे आहेत पुरस्कारार्थी...

**कार्यक्रमात विद्या पोळ-जगताप (सातारा), दत्ता बारगजे (बीड), डॉ. संजय दिगंबर जोशी (ठाणे), प्रा. डॉ. रंजना मधुकर कदम (अकोला), किरण भावसार (नाशिक), विद्या विनायक निकम (ठाणे), ॲड. डॉ. नीता प्रफुल्ल कचवे (अमरावती), जिल्हा साहित्य पुरस्कार प्रा. भानुदास रतन बेरड (अहिल्यानगर) आदींना सन्मानित करण्यात आले. सन्मानचिन्ह, मानपत्र, १० हजार रोख रक्कम, शाल, पुष्पगुच्छ व ग्रंथ असे पुरस्काराचे स्वरुप आहे.**

# राष्ट्रवादी काँग्रेसची स्टार प्रचारकांची यादी जाहीर

## • जळगावातून प्रतिभा शिंदेंचा समावेश





प्रतिनिधी । मुंबई

**राज्यातील महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने (अजित पवार गट) आपली कंबर कसली असून, प्रचारासाठी ४० स्टार प्रचारकांची अधिकृत यादी आज जाहीर केली आहे. स्टार प्रचारकांच्या यादीत जळगावमधून प्रतिभा शिंदेंचा समावेश आहे.**

पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या मान्यतेने ही यादी निवडणूक आयोगाकडे सुपूर्द करण्यात आली आहे. या यादीत पक्षाच्या दिग्गजांचा समावेश करण्यात आला आहे.

प्रमुख स्टार प्रचारकांमध्ये अजित पवार, सुनील तटकरे, धनंजय मुंडे, बाबासाहेब पाटील, दत्तात्रय भरणे, आदिती तटकरे, धर्मरावबाबा आत्राम, संजय बनसोडे, नवाब मलिक, मुश्ताक अंतुले, अमोल मिटकरी, रूपाली चाकणकर, अनिकेत तटकरे, राजेंद्र जैन, सिद्धार्थ टी. कांबळे, लहुजी कानडे, सुनिल मगरे, महेश शिंदे, सुरेखाताई ठाकरे, प्रतिभा शिंदे, प्रफुल्ल पटेल, हसन मुश्रीफ, नरहरी झिरवाळ, मकरंद जाधव-पाटील, अण्णा बनसोडे, इंद्रनील नाईक, अनिल पाटील, प्रताप पाटील चिखलिकर, सयाजी शिंदे, समीर भुजबळ, सना मलिक, इद्रिस नायकवाडी, इशान सिद्दीकी, शरद पाटील, सुरज चव्हाण, कल्याण आखाडे, नाझेर काझी, राजलक्ष्मी भोसले, नजीब मुल्ला, विकास पासलकर यांचा समावेश आहे.

### भारतीय लष्कराचे नवे सोशल मीडिया धोरण

**नवी दिल्ली ।** माहिती तंत्रज्ञानाच्या युगात बदलत्या गरजा लक्षात घेऊन भारतीय लष्कराने आपल्या सोशल मीडिया धोरणात मोठे बदल केले आहेत. नव्या नियमांनुसार, आता लष्करी अधिकारी आणि जवानांना इंस्टाग्राममवर आपले खाते उघडता येणार आहे. मात्र, राष्ट्रीय सुरक्षा आणि गोपनीयतेचा विचार करून या वापरावर कडक निर्बंध लादण्यात आले आहेत. भारतीय लष्कराने जारी केलेल्या नव्या मार्गदर्शक सूचनांनुसार, जवान इन्स्टाग्रामचा वापर केवळ माहिती मिळवण्यासाठी किंवा पोस्ट पाहण्यासाठी करू शकतील. त्यांना कोणत्याही पोस्टवर कमेंट करणे, पोस्ट लाईक करणे किंवा स्वतःचा कोणताही कंटेंट पोस्ट करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

### पंजाब पोलिसांचे २८५ ठिकाणी छापे

**चंदीगड ।** नशेखोरांविरुद्ध युद्ध या अंमली पदार्थविरोधी मोहिमेंतर्गत पंजाब पोलिसांनी गुरुवारी राज्यभरात २८५ ठिकाणी छापे टाकून ११५ अंमली पदार्थ तस्करांना अटक केली असून या कारवाईत ८७ एफआयआर नोंदवण्यात आल्या आहेत, अशी माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिली. अटक केलेल्यांकडून २६८ ग्रॅम हेरॉईन, १,८६० अंमली पदार्थांच्या गोळ्या व कॅप्सूल तसेच अंमली पदार्थांच्या विक्रीतून मिळालेले ६,७०० रुपये जप्त करण्यात आले.या छाप्यांसाठी ६१ राजपत्रित अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली १०० हून अधिक पोलीस पथके, सुमारे ८०० कर्मचाऱ्यांसह तैनात करण्यात आली होती. या मोहिमेदरम्यान २७६ संशयितांची तपासणी करण्यात आली. परिणामी, गेल्या २९९ दिवसांत अटक करण्यात आलेल्या अंमली पदार्थ तस्करांची एकूण संख्या ४१,७७५ वर पोहोचली आहे.

# नायलॉन मांजाच्या वापरावर न्यायालयाने उचलले कडक पाऊल

## • दोषी आढळल्यास होणार मोठी कारवाई

वृत्तसंस्था । मुंबई

**नायलॉन मांजाच्या वापराविरूद्ध न्यायालयाने कडक पावले उचलण्यास सुरूवात केली आहे. वेळोवेळी कडक निर्बंध घालुनही नायलॉन मांजाचा सर्रास वापर अजूनही सुरू असल्याने उच्च न्यायालयाने यात आता दोषी आढळल्यास मोठ्या आर्थिक शिक्षेचा प्रस्ताव ठेवला आहे. नायलॉन मांजाला विरोध करत काही नागरिकांनी न्यायालयात धाव घेतली आहे.**



आता, न्यायालयाने देखील ही बाब गंभीरतेने घेत नागरिकांच्या सूचना व हरकती मागवल्या आहेत. नायलॉन मांजाचा वापर करणाऱ्या मुलांच्या पालकांना आणि विक्री करणाऱ्यांना मोठ्या दंडाची शिक्षा सुनावली जाणार आहे. यासंदर्भात गृह विभागाने सर्वच जिल्हाधिकारी कार्यालयास पत्र पाठवले आहे. नायलॉन मांजा विरोधात नागपूर उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने आदेश पारित करुन २०२१ पासून नायलॉन मांजाच्या वापरावर अंकुश ठेवण्यासाठी वेळोवेळी विविध आदेश पारित केले आहेत. मात्र, त्यात फारसा बदल झालेला नाही.

मकर संक्रांतीच्या सणाला अनेक ठिकाणी पतंगोत्सव साजरा केला जातो, मात्र गेल्या काही वर्षात या पतंगांसाठी नायलॉन मांजाचा वापर होत असल्याने अनेक अपघात घडत आहेत. नायलॉन मांजामुळे नागरिकांच्या शरीरावर गंभीर जखमा होत असून गळा चिरल्याच्याही अनेक घटना घडल्या आहेत.त्यामुळे, एखादा अल्पवयीन मुलगा नायलॉन मांजाने पतंग उडवताना आढळल्यास त्याच्या पालकांना न्यायालयात ५० हजार रुपये दंड स्वरूपात जमा करण्याचा, तर प्रौढ व्यक्ती आढळल्यास त्यास ५० हजार रुपये दंड करण्याचे आदेश देण्याचा प्रस्ताव आहे.तसेच, जर एखाद्या विक्रेत्याकडे नायलॉन मांजाचा साठा आढळला तर त्याला अडीच लाख रुपये दंड स्वरूपात जमा करण्याची प्रस्तावित शिक्षेची तरतुद असणार आहे. यावरती, सुनावणी येत्या ५ जानेवारी २०२६ रोजी उच्च न्यायालयाने निश्चित केली आहे.त्यामुळे, या प्रस्तावित शिक्षे संदर्भात कुणाला सूचना किंवा आक्षेप असतील तर त्यांनी सुनावणीच्या तारखेला हजर राहून आपले निवेदन सादर करावे, असे न्यायालयाने आवाहन केले आहे.

## २०० फूट फरफटत नेलं, १४ जण गंभीर जखमी

# भरधाव वाहनाची बैलगाड्यांना धडक

वृत्तसंस्था । बीड

आष्टी तालुक्यातील शेंडगेवाडी (सावरगाव गड) येथील ऊसतोडणी कामगारांच्या बैलगाड्यांना आज पहाटे एका भरधाव वाहनाने भीषण धडक दिली. या हृदयद्रावक घटनेत १४ कामगार गंभीर जखमी झाले असून, एका बैलाचा जागीच मृत्यू झाला आहे. तर पाच बैल गंभीर जखमी झाले आहेत. वृद्धेश्वर साखर कारखाना (पिंपळगाव कासार) येथे ऊसतोडणीसाठी हे कामगार



आपल्या बैलगाड्यांसह जात होते. आज गुरुवारी पहाटे ६ वाजेच्या सुमारास तिसगाव-शेवगाव रस्त्यावर समोरून येणाऱ्या एका वाहनाने अचानक आपला ट्रॅक सोडून विरुद्ध दिशेला येत असलेल्या बैलगाड्यांना जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, बैलगाड्या सुमारे २०० फूट लांब फरफटत गेल्या.

### १४ जण गंभीर जखमी

या अपघातात एकूण १४ जण जखमी झाले आहेत. त्यापैकी पूजा नाना शेंडगे (वय ३०) आणि शरद शेंडगे (वय ४०) यांची प्रकृती चिंताजनक असल्यानं त्यांना तातडीने अहिल्यानगर येथील इंपल्स हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आलं आहे. उर्वरित १२ (पान २ वर)

### जगात सर्वांत स्वस्त अंडी भारतात?

वृत्तसंस्था । मुंबई

हिवाळा सुरू होताच देशभरात थंडीचा कडाका वाढला आहे. त्यामुळे प्रथिनांचा स्वस्त आणि आरोग्यदायी स्त्रोत म्हणून अंडी खाण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे दरात वाढ होत असते.

थंडीमुळे मागणीत अचानक वाढ झाली असली तरी, उत्पादन आणि पुरवठ्यात वाढ न झाल्यामुळे बाजारात अंड्यांचा काहीसा तुटवडा निर्माण होऊन किरकोळ बाजारात एका अंड्याचा दर सरासरी ८ ते १० रुपयांवर गेला आहे.

# मोबाईलवर रील्स तयार करा

## • जळगाव महापालिकेकडून बक्षीस मिळवा

प्रतिनिधी । जळगाव

**मोबाईलवर रील तयार करण्याचा ट्रेंड अलीकडे तरूणाईत मोठ्या प्रमाणात वाढला असून, अनेक तरुण-तरुणी या माध्यमातून आपली कला दाखवून चांगली आर्थिक कमाईही करत आहेत. सोशल मीडियाच्या या वाढत्या प्रभावाची दखल घेत जळगाव शहर महानगरपालिकेनेही आता रील्स तयार करणाऱ्यांना रोख बक्षिसे देण्याचा निर्णय घेतला आहे.**



सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदानाचा टक्का वाढविणे तसेच नागरिकांमध्ये मतदानाबाबत व्यापक जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने महानगरपालिका प्रशासन व स्वीप अभियानाच्या संयुक्त विद्यमाने रिल्स मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सोशल मीडियासारख्या प्रभावी आणि वेगवान माध्यमाचा उपयोग करून मतदारांपर्यंत थेट पोहोचणे, हा स्पर्धेचा मुख्य हेतू आहे. सध्याच्या काळात सोशल मीडिया हे जनसंपर्काचे प्रभावी साधन ठरत असून, विशेषतः तरुण पिढी मोठ्या प्रमाणावर या माध्यमाशी जोडली गेली आहे. ही बाब लक्षात घेऊन मतदानाचे (पान २ वर)

# सीईटी परीक्षांसाठी आधार प्रमाणीकरण, अपार आयडी अनिवार्य

## अपंग उमेदवारांना यूडीआयडी सादर करणे बंधनकारक

वृत्तसंस्था । मुंबई

**महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे (सीईटी कक्ष) घेण्यात येणाऱ्या 'सीईटी २०२६' परीक्षांसाठी अर्ज करणाऱ्या सर्व उमेदवारांसाठी आधार प्रमाणीकरण आणि अपार आयडी अनिवार्य करण्यात आल्याची माहिती सीईटी कक्षाने दिली.**

शैक्षणिक वर्ष २०२६ साठी विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सीईटी परीक्षांचे ऑनलाइन अर्ज लवकरच अधिकृत




संकेतस्थळावर उपलब्ध होणार आहेत.

सीईटी कक्षाच्या सूचनेनुसार, सर्व उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वी त्यांच्या आधार कार्डवरील तपशील अद्ययावत करणे आवश्यक आहे. नाव, जन्मतारीख, छायाचित्र, पत्ता, वडिलांचे नाव, तसेच आधारशी संलग्न मोबाइल क्रमांक आदी तपशील योग्य आणि अद्ययावत असणे बंधनकारक आहे. आधारशी मोबाइल क्रमांक लिंक व सक्रिय असणे आवश्यक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

तसेच ‘सीईटी २०२६’साठी नोंदणी करताना ऑटोमेटेड पर्मनंट अकॅडमिक अकाउंट रजिस्ट्री अर्थात अपार आयडी सादर करणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व इच्छुक उमेदवारांनी वेळेत अपार आयडी तयार करून ठेवावा, असे आवाहन सीईटी कक्षाने केले आहे.

अपंग उमेदवारांसाठी विशेष तरतूद करताना सक्षम प्राधिकरणाकडून मिळालेले अपंगत्व प्रमाणपत्र किंवा युनिक डिसॅबिलिटी आयडी कार्ड अपलोड करणे अनिवार्य करण्यात आले आहे. पुढील सामाईक प्रवेश प्रक्रियेदरम्यान यूडीआयडी आवश्यक ठरू शकत असल्याने, अपंग उमेदवारांनी (पान २ वर)

**महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने शैक्षणिक वर्ष २०२६ च्या सीईटी परीक्षांसाठी आधार प्रमाणीकरण आणि अपार आयडी अनिवार्य केल्याने उमेदवारांना आता तातडीने आपली कागदपत्रे अद्ययावत करावी लागणार आहेत.'सीईटी २०२६' संदर्भातील सविस्तर अधिसूचना, परीक्षा वेळापत्रक आणि पुढील मार्गदर्शक सूचना वेळोवेळी जाहीर केल्या जाणार असून, उमेदवारांनी राज्य सीईटी कक्षाच्या अधिकृत संकेतस्थळाला नियमित भेट द्यावी, असे आवाहनही सीईटी कक्षाकडून करण्यात आली आहे.**

# नववर्ष स्वागतानिमित्त हॉटेल्स, उपहारगृहांची तपासणी

वृत्तसंस्था । मुंबई

**मावळत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे जल्लोषात स्वागत करण्यासाठी मुंबईसह सर्वत्र निरनिराळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. या पार्श्वभूमीवर नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित व निर्भेळ अन्नपदार्थ मिळावेत यासाठी अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) कंबर कसली आहे. राज्यातील हॉटेल्स, उपहारगृहे व खाद्य पदार्थांची विक्री करणाऱ्या आस्थापनांची प्रशासनाकडून सखोल तपासणी करण्यात येणार आहे.**

यामुळे नववर्षाच्या पार्श्वभूमीवर खाद्य पदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांना चाप बसणार आहे. नववर्षानिमित्त आयोजित विविध पार्ट्या व कार्यक्रमामध्ये मोठ्या प्रमाणात खाद्यपदार्थांची रेलचेल असते. यावेळी खाद्यपदार्थांच्या मागणीमध्ये लक्षणीय वाढ होते. त्यामुळे खाद्यपदार्थांमध्ये भेसळ होण्याची दाट शक्यता असते. तसेच हॉटेल्स व उपहारगृहांमध्ये मुदत संपलेला कच्चा माल, खाद्य व अखाद्य रंगांचा वापर होतो. त्यामुळे नागरिकांना भेसळयुक्त खाद्यपदार्थ मिळण्याची शक्यता अधिक असते. ही बाब लक्षात घेऊन खाद्यपदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्याविरोधात (पान २ वर)

# रोटरी वेस्टच्या शिवदुर्ग महोत्सवात स्पर्धकांनी साकारले १५ गड, किल्ले

● २७ ला वास्तु विशारद वरूण भामरे यांचे व्याख्यान; स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा

प्रतिनिधी । जळगाव



**येथील रोटरी क्लब ऑफ जळगाव वेस्टने आयोजित केलेल्या शिवदुर्ग महोत्सव पर्व -१ मध्ये शालेय विद्यार्थ्यांनी १२ तर खुल्या गटातील स्पर्धकांनी ३ गड-किल्ले साकार केले.**

युनोस्कोद्वारा छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ गड-कोट-किल्ल्यांना जागतिक वारसा यादीत नामांकन घोषित झाल्याबद्दल मायादेवी नगरातील रोटरी भवनच्या प्रांगणात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत शालेय विद्यार्थ्यांनी मुरुड जंजिरा किल्ला, तोरणा गड, मुरुड गड, मल्हार गड, लोहगड, शिवनेरी किल्ला, प्रतापगड, पन्हाळा किल्ला तर विद्यार्थ्यांच्या चार समूहाने सिंधुदुर्ग किल्ला साकार केले. खुल्या गटातील स्पर्धकांनी परमदुर्ग रायगड किल्ला आणि प्रतापगड साकारले आहेत.

याप्रसंगी रोटरी वेस्टचे अध्यक्ष गौरव सफळे, प्रकल्प सचिव देवेश कोठारी, प्रशासकीय सचिव महेश सोनी, प्रकल्प संकल्पना असलेले तुषार तोतला, प्रकल्प प्रमुख राहुल पवार यांच्यासह माजी अध्यक्ष कृष्णकुमार वाणी, सरिता खाचणे, प्रेसिडेंट इलेक्ट योगेश राका यांची प्रमुख उपस्थिती होती. रोटरी गव्हर्नर इलेक्ट डॉ. राजेश पाटील व माजी अध्यक्ष नितीन रेदासनी यांनी स्पर्धा प्रदर्शनास भेट दिली.

स्पर्धेचे परीक्षण इतिहास अभ्यासक महेश पवार आणि गड-किल्ले संवर्धक व अभ्यासक संतोष पाटील, डॉ.रणजीत चव्हाण यांनी केले. स्पर्धकांना रोटरॅक्ट वेस्ट क्लबचे प्रतीक वाणी, प्रथमेश मिसार, मोक्षदा ओगले यांनी सहकार्य केले.

किल्ल्यांचे हे प्रदर्शन २७ डिसेंबरपर्यंत सर्व नागरिकांना पाहण्यासाठी खुले आहे. यानिमित्ताने शनिवार, दि.२७ रोजी सायंकाळी ६ वाजता रोटरी भवन येथे किल्ले रायगडचे जतन-संवर्धन करणारे वास्तु विशारद वरूण भामरे यांचे व्याख्यान व स्पर्धेचा पारितोषिक वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

# साने गुरुजींच्या साहित्याने पिढ्या संस्कारित केल्या

● सुचिता पांढरकर यांचे प्रतिपादन



प्रतिनिधी । जळगाव

**मातृ हृदयाचे कवी, आपल्या हळव्या मनाने विद्यार्थ्यांना लळा लावणारे, श्यामच्या व्यक्तिमत्वातून आपल्या जीवन दर्शनाचा आरसा दाखवणारे साने गुरुजी आपल्या जीवनात संस्कारित पिढी घडवत राहिले. यामुळेच त्यांनी दिलेले आदर्श पुढे नेण्याची गरज असल्याचे मत सुचिता पांढरकर यांनी व्यक्त केले.**

आसोदा येथील सार्वजनिक विद्यालयात पूज्य साने गुरुजी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी मुख्याध्यापक डॉ.मिलिंद बागुल, पर्यवेक्षक एल.जे. पाटील उपस्थित होते.

यावेळी साने गुरुजी यांची भूमिका व अध्यक्षस्थान हितेश सोनवणे या विद्यार्थ्यांनी भूषविले. सिद्धी कोल्हे, केतकी महाजन, आयुष चौधरी, दीपेश पाटील, मोहित कोळी हेमांगी पाटील, जयश्री माळी, रितेश पाटील, कुणाल वाणी या विद्यार्थ्यांनी साने गुरुजी यांच्या जीवनातील कथा सांगून त्यांना अभिवादन केले सृष्टी डोळसे या विद्यार्थिनींनी बलसागर भारत होवो हे साने गुरुजींचे समर गीत सादर केले. वृषाली चौधरी यांनी साने गुरुजींच्या साहित्याच्या अनुषंगाने बोधकथा सांगितली. भावना चौधरी, शुभांगीनी महाजन, कविता भोळे यांनी अतिथी परिचय व स्वागत केले. सूत्रसंचालन नेहा खोडपे या विद्यार्थिनीने केले तर आभार शाश्वती माळी हीने मानले.

## थोडक्यात

### व.वा. च्या गिफ्ट कार्डला उस्फूर्त प्रतिसाद

**जळगाव ।** येथील व.वा. जिल्हा वाचनालयातर्फे वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी गिफ्ट काड्र्सला प्रतिसाद लाभत आहे. विद्यार्थ्यांसाठी व पालकासाठी नाताळच्या सुटीत पुस्तकांच्या माध्यमातून आपला आनंद द्विगुणीत करण्यासाठी खास लायब्ररी गिफ्ट कार्ड देऊ शकतात. पालक आपल्या पाल्यासाठी या योजनेचा लाभ घेवून त्याला आपला खरा मित्र म्हणजे पुस्तक मिळवण्यासाठी वर्षभाराकरिता ५०० अथवा ७०० रुपयांचे लायब्ररी वर्गणी गिफ्टकार्ड भेट देवू शकतात. ५०० रुपयांच्या लायब्ररी बुक गिफ्ट कार्डवर त्याला वर्षभर पुस्तक वाचनाचा लाभ घेता येईल. मोठ्या व्यक्तीसाठी एक हजार रुपयांचे लायब्ररी बुक गिफ्ट कार्डवर त्यांना वर्षभर एका वेळी दोन पुस्तके वाचनाचा लाभ घेता येणार आहे.

### बस्थानकातून तरूणांचे मोबाईल लांबविले

**जळगाव ।** शहरातील नवीन बसस्थानकात चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली असून मंगळवार, दि.२३ रोजी महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या दोन विद्यार्थ्यांचे मोबाईल लांबविण्यात आल्याची घटना घडली आहे. निखिल राजू मानके (वय-२०, रा.धानवड, ता.जळगाव) आणि मयुर मांगू पाटील (वय-२०, रा.चिंचखेडा, ता.जळगाव) हे जळगाव शहरात महाविद्यालयीन शिक्षण घेत असून मंगळवार दि.२३ रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास ते नवीन बसस्थानक आवारात असतांना अज्ञात चोरट्यांनी दोघांचे महागडे मोबाईल चोरून नेले. याप्रकरणी बुधवार, दि.२४ रोजी सायंकाळी ६ वाजता जिल्हापेठ पोलीस ठाण्यात धाव घेवून तक्रार दिली. पुढील तपास महिला पोलीस कॉन्स्टेबल अलका शिंदे करीत आहेत.

# 'मनभावन' उलगडणार भीमराव पांचाळे यांचा 'गजलेचा प्रवास'; आज प्रसारण

प्रतिनिधी । जळगाव

**खान्देश कॉलेज एज्युकेशन सोसायटीच्या रेडिओ मनभावनवरील 'श्वास गझल' या कार्यक्रमामध्ये गझलनवाज भीमराव पांचाळे यांचा 'गजलेचा प्रवास' उलगडण्यात येणार आहे. शुक्रवार (दि.२६) रोजी सकाळी १० वाजता ही विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे.**



जिल्ह्यातील पहिलं सामुदायिक रेडिओ केंद्र रेडिओ मनभावन ९०.८ एफएम वर सांस्कृतिक व साहित्यिक उपक्रम सातत्याने राबवले जात आहेत. याच उपक्रमांच्या मालिकेअंतर्गत 'श्वास गझलफ' या लोकप्रिय कार्यक्रमात गझलनवाज भीमराव पांचाळे यांची विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे. गझल परंपरेचा उगम, तिचा विकास, सामाजिक संदर्भ आणि आजच्या काळातील बदलते स्वरूप यावर आधारित 'गजलेचा प्रवास' या विषयावर ही मुलाखत असून, ती रेडिओ मनभावनचे केंद्र संचालक अमोल देशमुख यांनी घेतली आहे. या संवादात भीमराव पांचाळे यांनी गझलेतील आशय, संवेदनशीलता, श्रोत्यांशी असलेले भावबंध तसेच गझल लेखन व सादरीकरणातील बदलते प्रवाह याविषयी अनुभवाधारित आणि सखोल भाष्य केले आहे. या मुलाखतीचे प्रसारण शुक्रवार दि.२६ रोजी सकाळी १० वाजता करण्यात येणार असून त्याचे पुनःप्रसारण सायंकाळी ६ वाजता होणार आहे. श्वास गझल कार्यक्रम गझलप्रेमी श्रोत्यांसाठी वैचारिक व सांस्कृतिक संवादाचे प्रभावी माध्यम ठरत आहे.

# भाजप कार्यालयात भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी जयंती साजरी

प्रतिनिधी । जळगाव

**देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न कविराज श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी यांची १०१ वी जयंती गुरुवार, दि.२५ रोजी सकाळी १०.३० वाजता भाजपा कार्यालय जी.एम. फाउंडेशन येथे साजरी करण्यात आली.**



कार्यक्रमाच्या सुरुवातीला आ.राजूमामा भोळे, महानगर जिल्हाध्यक्ष दीपक सुर्यवंशी यांच्याहस्ते प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर आ.भोळे यांनी अटलजींच्या जीवन कार्याविषयी माहिती दिली. याप्रसंगी जिल्हा सरचिटणीस विशाल त्रिपाठी, नितीन इंगळे, राहुल वाघ, जयेश भावसार, ज्येष्ठ पदाधिकारी उदय भालेराव, माजी नगरसेवक भगत बालाणी, मुकुंद मेटकर, महिला जिल्हाध्यक्ष नितूताई परदेशी, युवा मोर्चा अध्यक्ष महेश पाटील यांच्यासह भाजपाचे सर्व जिल्हा पदाधिकारी, मंडल अध्यक्ष मोर्चा, आघाडी अध्यक्ष व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाप्रसंगी संजय घुगे यांनी, अटलजींच्या जीवनावर आधारित कविता सादर केली. यानंतर व्यापार आघाडीचे जिल्हाध्यक्ष विनय बाहेती यांचे 'मोदी फिल्ड भारत' या पुस्तकाचे विमोचन आ.राजूमामा भोळे यांनी केले.

सूत्रसंचालन सरचिटणीस जयेश भावसार यांनी केले तर आभार मुकुंद मेटकर यांनी मानले.

# चाँद जयबून बी. सरवर तडवी यांना मानद डॉक्टरेट पदवी

प्रतिनिधी । जळगाव

ट्रान्सजेंडर अभ्यास आणि सामाजिक कार्य क्षेत्रात उल्लेखनीय व प्रेरणादायी योगदान देणारे भुसावळ येथील पारलिंगी सामाजिक कार्यकर्ता चाँद जयबून बी. सरवर तडवी यांना मानद डॉक्टरेट प्रदान करून गौरविण्यात आले आहे. नालंदा युनिव्हर्सिटी, पंजाब यांच्यावतीने दि.२५ रोजी पुणे येथे आयोजित विशेष कार्यक्रमात हा सन्मान देण्यात आला. डॉ.चाँद तडवी यांनी ट्रान्सजेंडर समुदायाच्या सांस्कृतिक परंपरा, सामाजिक ओळख, बदलते वास्तव आणि समकालीन प्रश्नांवर सखोल अभ्यासपूर्ण कार्य केले आहे. त्यांच्या संशोधनातून ट्रान्सजेंडर समुदायाच्या समस्या, आव्हाने आणि हक्क यांना समाजासमोर मांडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले आहे.

## पान १ वरुन

### साहित्यिक घाबरले तर......

करावी. जात सोडून आधुनिकतेकडे वाटचाल करावी माणसांनी माणूस म्हणून माणसांचे दुःख पहाण्याचे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. विवेक भापकर यांनी पुरस्काराच्या माध्यमातून वाचन संस्कृती रुजवणे व साहित्य चळवळ समृद्ध करण्याचा उद्देश स्पष्ट केला. प्रारंभी हुतात्मा स्मारक येथील समाधीस्थळी अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविकात ॲड. विश्वासराव आठरे यांनी चौथे शिवाजी महाराजांच्या जीवनाचा आढावा घेतला. पुरस्कारार्थींच्या सन्मानपत्राचे वाचन समन्वयक प्रा. गणेश भगत यांनी केले. परीक्षक प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे यांनी पुरस्काराची माहिती दिली. सूत्रसंचालन संजय आखाडे यांनी, आभार प्रा.रवींद्र देवढे यांनी मानले.

### भरधाव वाहनाची...

जखमींवर तिसगाव येथील श्री. हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. त्यामध्ये अभिषेक मरगळ, विशाल मरगळ कोमल ठेंगल, राणी ठेंगल, अशोक ठेंगल सीमा शेंडगे, संगीता शेंडगे, बबन शेंडगे, लिलाबाई शेंडगे, आदित्य शेंडगे, तुळजाई शेंडगे आणि राणी गोल्हार बहुतेक जखमींना गंभीर स्वरूपाचे फ्रॅक्चर आणि अंतर्गत जखमा झाल्या आहेत.

### नववर्ष स्वागतानिमित्त......

अन्न व औषध प्रशासनाने तपासणी मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या मोहिमेंतर्गत अन्न सुरक्षा अधिकारी त्यांच्या कार्यक्षेत्रातील रेस्टॉरंट्स, हॉटेल्स आणि खाद्य आस्थापनांची सखोल तपासणी करणार आहेत. या तपासणीदरम्यान मुदतबाह्य कच्च्या मालाचा वापर, अन्नपदार्थांमध्ये खाद्य व अखाद्य रंगांचा वापर, तसेच स्वच्छतेच्या निकषांचे पालन होते की नाही, याची काटेकोर तपासणी करण्यात येणार आहे. यामध्ये दोषी आढळणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हॉटेल्स, रेस्टॉरंटमधील स्वच्छतेला विशेष महत्त्व देण्यात येणार आहे. यासंदर्भात हॉटेल व्यावसायिकांमध्ये जनजागृती व प्रबोधन करण्यात येणार असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन आणि विशेष सहाय्य विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली.

### सीईटी परीक्षांसाठी आधार......

यूडीआयडी मिळवावे, असे सीईटी कक्षाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. लेखनिकाची सुविधा घेण्यास पात्र असलेल्या अपंग उमेदवारांनी ऑनलाइन अर्ज करताना दोन लेखनिकांची माहिती देणे बंधनकारक आहे. यासाठी लेखनिकाचे नाव, आधार क्रमांक, छायाचित्र, बोनाफाईड प्रमाणपत्र, तसेच शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र सादर करावे लागणार आहे.

### मोबाईलवर रील्स......

महत्त्व, प्रत्येक मताचे मूल्य, लोकशाहीतील नागरिकांची जबाबदारी तसेच मतदान हा आपला हक्क व कर्तव्य आहे, हा संदेश रील्सच्या माध्यमातून पोहोचविण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी तयार केलेल्या रील्समध्ये मतदान जनजागृतीचा सकारात्मक व प्रेरणादायी संदेश असणे आवश्यक आहे. कोणत्याही राजकीय पक्षाचा प्रचार, उमेदवारांचे समर्थन अथवा विरोध तसेच आचारसंहितेला बाधा पोहोचेल, असा मजकूर वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. केवळ मतदानाचे महत्त्व अधोरेखित करणारा, सर्वसामान्य मतदारांना मतदानासाठी प्रवृत्त करणारा आशय असलेल्या रील्सला प्राधान्य दिले जाणार आहे. स्पर्धेत उत्कृष्ट ठरलेल्या स्पर्धकांना प्रथम क्रमांकास ३०००, द्वितीय क्रमांकास २००० आणि तृतीय क्रमांकास १००० रूपये, अशी रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत.

# साने गुरुजींसारखे शिक्षक आजच्या काळाची गरज

● प्रा.डॉ.अशोक राणे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । जळगाव

**साने गुरुजी हे मातृहृदयी शिक्षक होते, ते मुलांची आईच्या ममतेने काळजी घेत असत. साने गुरुजींसारखे शिक्षक आजच्या काळाची गरज आहे, असे मत व्ही. पी. होले शिक्षणशास्त्र आणि शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक राणे यांनी व्यक्त केले.**



अण्णासाहेब बेंडाळे प्रतिष्ठानतर्फे ही.पी. होले शिक्षणशास्त्र आणि शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयात साने गुरुजी यांच्या जयंतीनिमित्त साने गुरुजी कथा व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून केसीई सोसायटीचे प्रशासकीय अधिकारी शशिकांत वडोदकर तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ.योगेश महाले उपस्थित होते. प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनींनी खरा तो एकची धर्म ही प्रार्थना म्हणून कार्यक्रमाची सुरुवात केली. यावेळी प्रा.डॉ. योगेश महाले यांनी, साने गुरुजींच्या दोन कथांद्वारे मानवी मूल्य व सेवाभाव याविषयी माहिती दिली. शशिकांत वडोदकर यांनी साने गुरुजीं विषयी सकल व तात्वीक माहिती देत साने गुरुजी संत आचरणाचे व्यक्तिमत्व होते, असे नमूद केले. कार्यक्रमानिमित्त विद्यार्थ्यांना श्यामची आई हे पुस्तक भेट देण्यात आले. यावेळी सर्व प्राध्यापकवृंद व प्रथम वर्ष बी.एडचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते

# वाहनांची कसून तपासणी





**जळगाव ।** महापालिका निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज झाले असून निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर गुरुवारी (दि.२५) पोलीस दलातर्फे महामार्गावरील जकात नाकाजवळ वाहनांची तपासणी मोहीम राबवण्यात आली.

# रायसोनी स्कुलच्या स्नेहसंमेलनातून मांडले आधुनिक समाजातील बदलांचे चिंतन

प्रतिनिधी । जळगाव

**बी.यू.एन रायसोनी इंग्लिश मीडियम स्कुलचे वार्षिक स्नेह संमेलन एक्सझुबेरेंट हा कार्यक्रम दि.२४ रोजी छत्रपती संभाजी राजे नाट्यगृहात पार पडला. कार्यक्रमात नाट्य व समूह नृत्यांच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीमधील मूल्यांची जाणीवकरून देत आधुनिक समाजातील बदलांवर चिंतन मांडण्यात आले.**



कार्यक्रमात ३६० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी नृत्य, नाटिका, रोबोटीक्स, सूत्रसंचालन अशा विविध गोष्टींमध्ये सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष शिरीष रायसोनी यांच्यासह संचालक व शिक्षक पालक संघ सदस्यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी वृध्दाश्रमावरील नाटीका व छत्रपती संभाजी राजे यांच्या जीवनावर आधारीत सादरीकरणाने प्रेक्षकांच्या अंगावर काटा उभा राहिला होता. त्याच प्रमाणे विविध गितांच्या माध्यमातून वेगवेगळ्या राज्यातील वेशभूषांचे प्रदर्शन पहायला मिळाले. दरम्यान, महिला व मुलींनी स्व-संरक्षण कसे करावे याचे प्रात्यक्षिक दहावीची विद्यार्थीनी कावेरी नितीन सुरवाडकर हिने करून दाखविले. यावेळी विद्यार्थ्यांच्या जन्म जात कौशल्यांचा शोध घेण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या मल्टिपल इंटेलिजन्स टेस्ट या उपक्रमाचे महत्व प्राचार्य मनोज शिरोळ यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या शेवटी अध्यक्ष शिरीष रायसोनी, उपाध्यक्ष उमेद रायसोनी व इतर मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ट विद्यार्थ्यांना व कलाकारांना गौरविण्यात आले.

**■ ...तर पाल्य उच्च शिखरावर पोहोचू शकतो**

यावेळी बोलतांना अध्यक्ष शिरीष रायसोनी यांनी, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मानसशास्त्रीय समुपदेशनाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच प्रत्येक पाल्याचा अंतर्गत गुण ओळखून त्याला योग्य दिशा दिल्यास तो नक्कीच आयुष्यात उच्च शिखरावर पोहोचू शकतो, असे ते यावेळी म्हणाले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (मोबा. - ७५८८८१३१३२) (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

# शहादा पालिकेत लोकशाहीची चक्रे पुन्हा सुरु

## चार वर्षांचे प्रशासकराज संपुष्टात; नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांनी स्वीकारला पदभार

प्रतिनिधी । शहादा

**येथील नगर पालिकेच्या निवडणुकीत जनता विकास आघाडीच्या माध्यमातून लोकनियुक्त नगराध्यक्षपदी निवडून आलेले अभिजीत मोतीलाल पाटील यांनी दि. २४ डिसेंबर रोजी पदाचा कार्यभार स्वीकारला. पदभार स्वीकारताच कार्यकर्त्यांनी पालिकेच्या आवारात फटाक्यांची आतषबाजी करीत जल्लोष केला. शहादा पालिकेच्या १५६ वर्षाचा इतिहासात अभिजीत पाटील ४१ वे नगराध्यक्ष व चौथे लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारणारे ठरले. पालिकेचे चार वर्षांचे प्रशासकराज संपुष्टात येऊन लोकशाहीची चक्रे पुन्हा सुरू झाली आहेत.**



शहादा नगरपरिषदेच्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासह २९ सदस्यांपैकी नऊ नगरसेवक पदांचा जागांसह थेट जनतेतून नगराध्यक्षपदी अभिजीत पाटील यांनी विजय मिळविला. त्यांनी मुख्याधिकारी तथा प्रशासक साजिद पिंजारी यांच्याकडून नगराध्यक्ष पदाचा कार्यभार स्वीकारला. नगरपरिषद ही शहरातील जनतेला सोयी सुविधा उपलब्ध करून देणारी संस्था आहे. या संस्थेत जनतेने सेवा करण्याची संधी उपलब्ध करून दिल्याने नगराध्यक्ष अभिजीत पाटील यांनी पालिका इमारत प्रवेशद्वाराच्या उंबऱ्यावर नतमस्तक होत नगराध्यक्षांच्या दालनात प्रवेश केला.

यावेळी माजी लोकनियुक्त नगराध्यक्ष व त्यांचे पिताश्री मोतीलाल पाटील, माजी उपनगराध्यक्ष शेख जहीर शेख मुशीर यांच्यासह पत्नी प्रिती अभिजीत पाटील, जनता विकास आघाडीचे नगरसेवक, नगरसेवक पदाचे उमेदवार व उपस्थित कार्यकर्त्यांनी त्यांना नगराध्यक्ष पदाच्या खुर्चीवर बसवून पदभार स्वीकारण्याचा सोहळा पार पाडला. प्रशासनातर्फे मुख्याधिकारी साजिद पिंजारी यांनी नगराध्यक्षांचे स्वागत केले. यावेळी नवनिर्वाचित नगरसेवक वसीम सलीम तेली, बतुलबी नाजीम पिंजारी, सुलताना बी नासिर बेलदार, ॲड. दानिश हाफिज पठाण, भाग्यश्री मनीष चौधरी, गायत्री परेश निगोळे, डॉ. शहेरनाज अजहर खान पठाण, भारती सुरेश चव्हाण, सय्यद अकिल सय्यद नूर आदींसह शहादा तालुका एज्युकेशन संस्थेचे उपाध्यक्ष हिरालाल पटेल, बाजार समितीचे उपसभापती सत्यानंद पाटील, माजी नगरसेवक नाना निकुंभ, रविंद्र जमादार, शिवसेना शहर प्रमुख जितेंद्र जमदाडे, मुकेश चौधरी, परमानंद पाटील, हेमराज पाटील, भूपेंद्र चौधरी, नितीन चौधरी, गोटूनाना पाटील, चंद्रकांत पाटील, गिरीश पाटील, डॉ. सुरेश नाईक, नगिन पाटील, राहुल सनेर, कपिल पाटील, मनोज चौधरी, हिरालाल पाटील, लक्ष्मण पाटील, अजित बाफना, सतीश जव्हेरी, छोटू पाटील, निलेश मराठे, बबलू गुप्ता, प्रविण भावसार, राष्ट्रवादी शरदपवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष एन. डी. पाटील, शिवसेनेचे तालुकाप्रमुख मनलेश जयस्वाल, दिलीप गांगुर्डे, उमेश पाटील, डॉ. अजहर पठाण, नगीन गुरव, राजेंद्र अग्रवाल, जितेंद्र मोरे, हरीभाई पाटील, ॲड. सादिक खाटीक, प्रवीण भावसार, निलेश छाजेड, महेंद्र चौधरी, अक्षय छाजेड आदींसह विविध सामाजिक, सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, जनता विकास आघाडीकडून निवडणूक लढविलेले कार्यकर्ते उपस्थित होते.

> **शहादेकर जनतेचे सर्वप्रथम आभार. शहरासमोर असंख्य समस्या, अडचणी आहेत. त्या सोडवण्यासाठी कटिबद्ध आहोत. जनतेने जो कौल दिला आहे तो वेगवेगळ्या विचारधारेच्या लोकांनी एकत्रित येऊन काम करण्याचा दिला आहे. शहर विकासासाठी संपूर्ण शहादेकर जनता व निवडून आलेले लोकप्रतिनिधी सर्वजण एकत्रित काम करतील हा आमचा प्रयत्न राहील.**
>
> – अभिजीत पाटील
> (लोकनियुक्त नगराध्यक्ष शहादा)

## कोषागार कार्यालयात निवृत्तीवेतन प्रणालीबाबत बैठक

प्रतिनिधी । धुळे

जिल्हा कोषागार कार्यालय, धुळे येथे अप्पर कोषागार अधिकारी (निवृत्तीवेतन) यांच्या दालनात धुळे जिल्ह्यातील राज्य शासकीय सेवेतील सेवानिवृत्त कर्मचारी व अधिकारी संघटनांची निवृत्तीवेतन प्रणालीतील सुधारणा विषयक बैठक संपन्न झाली. या बैठकीत निवृत्तीवेतन प्रणालीतील सुधारणा संदर्भातील शासन निर्णय, परिपत्रके व अन्य विषयांबाबत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारकांसाठी निवृत्तीवेतन वाहिनी या प्रणालीमध्ये ऑनलाईन स्वरूपात तक्रार निवारण मॉड्युलची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, या माध्यमातून निवृत्तीवेतनधारकांना घरबसल्या मोबाईलद्वारे ऑनलाईन तक्रार दाखल करता येणार आहे. सदर तक्रारींचे उत्तर कोषागार कार्यालयाकडून ऑनलाईन स्वरूपात देण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. तसेच कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना कोषागार कार्यालयाकडून ओळखपत्र देण्याची कार्यवाही लवकरच सुरू करण्यात येणार आहे.

## थोडक्यात

### पटेल स्कूलमध्ये गणितीय उपक्रमांचा उत्सव

**शिरपूर ।** तालुक्यातील वरुळ येथील आर. सी. पटेल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये महान भारतीय गणिततज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त गणितीय उपक्रम व प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. नर्सरी पासून इयत्ता चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात मोठ्या उत्साहात सहभाग घेत शाळेच्या परिसराला जणू गणित नगरीचे स्वरूप प्राप्त करून दिले. मुख्याध्यापिका सपना मराठे व शिक्षकांनी हा उपक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि नावीन्यपूर्ण पद्धतीने राबविला. मुख्याध्यापिका सपना मराठे, ममता पाटील, विद्या पाटील, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी संयोजन केले

### गोसावी वाचनालयातर्फे ११ रोजी प्रश्न मंजुषा

**नंदुरबार ।**येथील कै. इंदुबाई बाबूगिरी गोसावी वाचनालयातर्फे भव्य प्रश्न मंजुषा कार्यक्रम दि.११ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे.येथील कै. इंदुबाई बाबूगिरी गोसावी वाचनालयातर्फे भव्य प्रश्न मंजुषा कार्यक्रम दि.११ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. इ. ५ वी ते १० वी व व महाविद्यालय गटात स्पर्धा होतील. एलसीडी प्रोजेक्टरने प्रश्नावली सादर केली जाईल. चार पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडायचा आहे. विजेत्यांना ८ हजार रुपये रोख बक्षीस, ट्रॉफी व प्रशस्तीपत्र दिले जाणार आहे. कोण बनेगा करोडपती सारखाच हा कार्यक्रम असेल. सुरुवातीला जलद प्रश्न विचारले जातील. जो गट आधी उत्तर देईल तो गट हॉट सीटवर विराजमान होईल. त्या प्रत्येक गटाला १० प्रश्न विचारले जातील. जे योग्य उत्तर देतील अशा विजेत्यांना पारितोषिक दिले जातील. –

# धुळे मनपाने घेतला राजर्षी शाहू महाराज नाट्यगृहाचा ताबा

## ➲ आयुक्त तथा प्रशासक नितीन कापडणीस यांचे आदेश



प्रतिनिधी । धुळे

**महापालिकेतर्फे मनपा मालकीचा छत्रपती राजर्षी शाहु महाराज नाट्यगृहाचा ताबा मनपा आयुक्त तथा प्रशासक नितीन कापडणीस यांच्या आदेशाने घेण्यात आला.**

महापालिकेमार्फत सुमारे १७ वर्षापुर्वी छत्रपती शाहु नाट्य मंदिराची निर्मिती करण्यात आलेली होती. सदर नाटयगृह खाजगी संस्थेस कराराने चालविण्यासाठी देण्यात आलेले होते. सदर संस्थेच्या कराराची मुदत संपल्यानंतर निविदा प्रसिध्द करण्यात आली. व त्या पुढील कालावधीसाठी त्यात कोणीही सहभागी न झाल्याने सदर नाट्यगृह खाजगी संस्थेमार्फत कार्यरत होते. तथापी सद्यः स्थितीत महापालिका निवडणुकीची कार्यवाही सुरु असल्याने सदर नाटयगृह महापालिकेमार्फत दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी आहे त्या स्थितीत ताब्यात घेण्यात आलेले आहे.

याबाबत उचित कायदेशीर कार्यवाही व पुर्तता करुन नाटयगृह दुरुस्ती व नुतनीकरणाबाबत लवकर निर्णय घेण्यात येणार आहे. सहा. आयुक्त किशोर सुडके, राजेंद्र माईनकर, नगररचना उपअभियंता कमलेश सोनवणे, प्रकाश सोनवणे, तसेच तत्कालीन नाटयगृहाचे व्यवस्थापक राजेंद्र भावसार आदी उपस्थित होते.

# ग्रामविकास मंत्री ना.जयकुमार गोरे यांनी संवाद साधत अधिकाऱ्यांना दिल्या सूचना

## ● सीईओ अजीज शेख यांच्यासह अधिकारी बैठकीत होते सहभागी

प्रतिनिधी । धुळे



**राज्याचे ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे यांनी आज अधिकाऱ्यांशी संवाद साधत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजीज शेख यांच्यासह विभाग प्रमुख आणि तालुकास्तरीय अधिकारी या ऑनलाइन बैठकीत सहभागी झाले होते.**

ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून प्रामुख्याने काम करणाऱ्या ग्रामपंचायतीस कामगिरी नुसार प्रोत्साहित करून त्यांची कार्यक्षमता वाढविण्याकरिता उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांसाठी सन २०२५ – २६ या आर्थिक वर्षापासून तालुका, जिल्हा, महसूल विभाग व राज्य अशा स्तरांवर प्रोत्साहन देण्याकरिता मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान हे राबविण्यात येत आहे. या अभियानाची सुरुवात दि.१७ सप्टेंबर २०२५ पासून झाली. या अभियाना संदर्भात ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी व्हीसीव्दारे अधिकारी वर्गाशी संवाद साधला. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत सर्व गटविकास अधिकारी, संपर्क अधिकारी यांनी १० ग्रामपंचायतींना भेटी द्याव्यात व तसा अहवाल सादर करावा. अभियान अंतर्गत केलेल्या कामाची माध्यमांमधून जास्तीत जास्त प्रचार प्रसिद्धी करावी. ग्राम पंचायत कराची थकबाकी मध्ये शासन निर्णयानुसार ५० टक्के सुट देणेबाबत सर्व ग्राम पंचायत अधिकारी यांनी कारवाई करावी. शासन निर्णयानुसार ग्रामस्थांना त्याचा लाभ होईल, या दृष्टीने अंमलबजावणी करावी, अशा सूचना दिल्या.

ऑनलाईन बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी अजीज शेख, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश इंगळे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक राजन पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्नेहा पवार, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत साबळे, महिला बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अजय फडोळ, गटविकास अधिकारी नितीन खंडेराय यांच्यासह सर्व खाते प्रमुख, गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी ग्राप, शिक्षण उपस्थित होते.

# देवभाने धरणातून रब्बीसाठी पहिले आवर्तन

प्रतिनिधी । धुळे

**देवभाने धरण हे देवभाने, सरवड व धनूर–लोणकुटे शेती शिवारासाठी महत्वपुर्ण आहे. हे धरण या गावांची तहानही भागवित असते. मात्र लहानश्या नदीवर मोठे धरण असल्याने ते लवकर भरत नाही. पावसाळा कमी असला तर साठ सत्तर टक्केच भरत असते. या धरणात पांझरेसह अक्कलपाड्याचे पाणी राखीव करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. पांझरेच्या प्रवाही पाण्यातून हे धरण भरण्यासाठी तांत्रिक बाबींचा अभ्यास केला जात आहे. त्यानुसार ही उपाय योजना करण्यासाठी आ. राम भदाणे प्रयत्नशिल असल्याचे जिल्हा परीषदेचे माजी अध्यक्ष मनोहर भदाणे यांनी सांगितले.**

धुळे तालुक्यातील देवभाने धरणातून रब्बीसाठी मंगळवारी पहिले आवर्तन सोडण्यात आले. जिल्हा परीषदेचे माजी अध्यक्ष तथा भाजपाचे जेष्ठ नेते मनोहर भदाणे यांच्या हस्ते आवर्तन सोडण्यात आले.

महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष भटू पाटील, मराठा सेवा संघाच्या कृषी विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रवीण पाटील, तुषार माळी, दुर्गेश पाटील, शेतकरी प्रभाकर देसले, भिकन देसले, नथ्थू भामरे, राहुल सोनवणे, स्वामी देसले, दिनेश देसले, मिलिंद देसले, सागर देसले, दत्तू देसले, विक्की देसले, उदय देसले, निलेश देसले आदी उपस्थित होते.

### अक्कलपाड्याचे पाणी देवभानेसाठी राखीव हवे ?

अक्कलपाड्याची निर्मिती झाली. त्यावेळी देवभाने धरणासाठीही पाणी राखीव करणे आवश्यक होते. तत्कालिन संबंधितांनी दुर्लक्ष केले. हितवर्धक आरक्षण करून घेतले. आता हे धरण भरण्यासाठी पांझरेचे वाहून जाणारे पाणी कमी खर्चात टाकण्यासाठी नियोजन सुरु आहे. निमडाळेपर्यंत येणारे पाणी ग्रॅव्हेटीने या धरणात टाकण्यासाठी अभ्यास केले जात आहे. असे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष मनोहर भदाणे यांनी सांगितले.

यावेळी माजी अध्यक्ष भदाणे बोलत होते. ते पुढे म्हणाले, देवभाने हे धुळे ग्रामिणमधील महत्वाचे धरण आहे. बऱ्यापैकी पावसाळा असूनही भरण्यास उशिर होतो. ते लहानश्या नदीवर आहे. परीणामी पावसाळ्यात लवकर भरत नाही.

> **जामफळचे पाणी देवभाने धरणात।**
>
> जामफळ–कनोली महत्वाकांक्षी योजना आहे. या माध्यमातून देवभाने धरण भरण्यासाठी नियोजन झाले आहे. यातील राखीव पाण्याने उन्हाळ्यातही टंचाई निवारण्यास मोठी मदत होणार आहे. त्या दृष्टीने गतिमान हालचाली सुरु आहेत.
>
> – आ.राम भदाणे

# नंदुरबार येथे विजयी मिरवणुकीत दोन गटात वाद; ५ जखमी

प्रतिनिधी । नंदुरबार

**पालिका निवडणुकीतील विजयी मिरवणूक अडविल्याच्या वादातून नंदुरबारातील माळीवाड्यात झालेल्या दोन गटांतील हाणामारीत पाच जण जखमी झाले. हाणामारीत दोन्ही गटांकडून धारदार शस्त्रे आणि लाठ्याकाठ्यांचा वापर करण्यात आला. शिवाय वाहनाची तोडफोड करण्यात आली. याप्रकरणी परस्परविरोधी फिर्यादींवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

नंदुरबार पालिकेचा निकाल रविवारी जाहीर झाला. सोमवारी माळीवाड्यात विजयी रॅली काढण्यात आली होती. या रॅलीला एका भागात जाऊ दिले नाही या कारणावरून दोन गटांत वाद झाला. त्याचे पर्यवसान मारहाणीत झाले. तलवार, चाकू, लोखंडी सळई, लाकडी दांडक्याचा वापर दोन्ही गटांकडून करण्यात आला. वाद झाला त्यावेळी परिसरात तणाव निर्माण झाला होता. पोलिसांनी धात घेत जमावावर नियंत्रण मिळविले. त्यानंतर वाढीव पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला.याप्रकरणी पहिली फिर्याद मेघा राकेश माळी यांनी दिली. विजयी रॅली का जाऊ दिली नाही या कारणावरून जमावाने शस्त्र आणि लाठ्याकाठ्यांनी मारहाण केली. महिलांच्या गळ्यातील पोत काढून घेतली. वाहनाचे नुकसान केल्याचे म्हटले आहे. त्यांच्या फिर्यादीवरून शिवाजी तुमडू माळी, लक्ष्मण दशरथ माळी, भरत दशरथ माळी, दिनेश साहेबराव माळी, अक्षय सदाशिव माळी, हर्षल आनंदा माळी, गणेश संतोष माळी, दीपेश माळी, मधुकर माळी, मयूर माळी, आनंद बाबूराव माळी, भटू माळी, स्वामी माळी, जयेश माळी, कार्तिक माळी, स्वामी माळी, स्वप्नील माळी, दर्शन माळी, अविनाश उर्फ दादा बगळा माळी, विक्की माळी, आदित्य माळी, जयेश मराठे, लक्ष्मण छोटू माळी, व इतर जमाव यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


## जाहीर नोटीस

**म. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळोदा यांचे न्यायालयात प्रकरण क्र. /जन्म / मृत्यु नोंद. अर्ज/फौज/पे. नो/कावि–८३/२०२५**

श्री/श्रीमती बाबुताल डेवा डावरे
रा. बोरद, ता.तळोदा
जि. नंदुरबार **अर्जदार/वादी**

**विरुध्द**

निबंधक जन्म मृत्यु तथा
गटविकास अधिकारी
पं.स. तळोदा ता. तळोदा
जि. नंदुरबार **गैरअर्जदार**

**जन्म–मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ (सुधारण अधिनियम २०२३) मधील कलम–१३ (२) व (३) प्रमाणे जन्म–मृत्यु दाखल्यास हरकती संबंधी जाहीर नोटीस**

या नोटीसीद्वारे तमाम नागरीकांना कळविणेत येते कि, ज्याअर्थी अर्जदार यांनी मे कोर्टात जन्म–मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारणा अधिनियम २०२३) चे कलम १३ (२) (३) प्रमाणे जन्म मृत्यु नोंदणी संदर्भात अर्ज केलेला असुन अर्जदार यांनी त्यांची/त्यांचे/त्यांचा/ बहीन नामे **कानुबाई बाप डेबा डावरे** यांच्या जन्म दिनांक– **१०/०७/२००७ रोजी बोरद ता. तळोदा जि. नंदुरबार** येथे झाल्या बाबत त्यांच्या अर्जात नमुद केले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास सदर अर्जा संबंधी हरकत, तक्रार, म्हणणे द्यावयाचे असेल त्यांची सुनावणी – **(पेपर नोटीस प्रसिध्द केल्या पासुन १५ दिवसांनी) दिनांक- / /२०२५ रोजी सकाळी ११.०० वा.** तुम्ही स्वःत अगर वकीलां मार्फत म. कार्यकारी दंडाधिकारी तळोदा यांचे दालनात हजर होऊन आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा सदर अर्जासंबंधी कोणाचीही तक्रार नसल्याचे गृहीत धरुन अर्जाचे सुनावणीचे कामकाज पुढे चालविले जाईल याची नोंद घ्यावी.

नमुद कालावधी नंतर येणाऱ्या आक्षेप / तक्रार हरकतीचा विचार केला जाणार नाही. तसेच कोणतीही हरकत / आक्षेप / तक्रार या कार्यालयास प्राप्त न झाल्यास जन्म मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील तरतुदीनुसार नोंदीच्या अर्जाबाबत निर्णय घेण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस ही माझे सही व शिक्यानिशी आज रोजी दिली असे.

**ठिकाण :– तळोदा**
**दिनांक : २२/१२/२०२५**

(शिक्का) /–
स्वाक्षरी
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार तळोदा**


# तळोदा न.पा.च्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष, नगरसेवकांनी घेतली अजित पवारांची भेट

## शहराच्या विकासाच्या दृष्टीने प्रस्तावित विविध योजना, रखडलेल्या कामांबाबत मांडली भूमिका

प्रतिनिधी । तळोदा

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी तळोदा नगरपरिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला मिळालेल्या घवघवीत यशाबद्दल अभिनंदन करण्यासाठी तळोदा नगरपरिषदेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा भाग्यश्री योगेश चौधरी, सर्व नगरसेवक, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष अभिजीत मोरे , पक्षाच्या राष्ट्रीय प्रवक्त्या प्रतिभा शिंदे तसेच पॅनल प्रमुख योगेश चौधरी यांना मुंबई येथे आमंत्रित करून विशेष अभिनंदन केले.**



मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचे राष्ट्रीय नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सदिच्छा भेट घेतली. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे पॅनल प्रमुख गट योगेश चौधरी यांच्या नेतृत्वाखाली तळोदा नगरपालिकेतील एकूण ११ नगरसेवक आणि कार्यकर्ते या भेटीसाठी उपस्थित होते.

मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात झालेल्या या भेटीदरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नवनिर्वाचित नगराध्यक्ष आणि सर्व नगरसेवकांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. नगरपालिकेच्या माध्यमातून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी काम करण्याची अपेक्षा व्यक्त करत त्यांनी तळोदा शहराच्या विकासासाठी आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन याप्रसंगी दिले. या भेटीत तळोदा शहरातील पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, ड्रेनेज व्यवस्था तसेच इतर नागरी विकास कामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. शहराच्या विकासाच्या दृष्टीने प्रस्तावित असलेल्या विविध योजना आणि रखडलेल्या विकास कामांबाबत नगराध्यक्ष व नगरसेवकांनी अजित पवार यांच्यासमोर भूमिका मांडली.

**शासनस्तरावर आवश्यक ती मदत व सहकार्य देण्यात येईल**

यावेळी अजित पवार यांनी तळोदा नगरपालिकेच्या माध्यमातून शहराचा विकास गतिमान करण्यासाठी शासनस्तरावर आवश्यक ती मदत व सहकार्य देण्यात येईल, असे स्पष्ट केले. या भेटीमुळे तळोदा शहराच्या विकासाला गती मिळेल, असा विश्वास नगराध्यक्ष भाग्यश्री चौधरी आणि उपस्थित नगरसेवकांनी व्यक्त केला. याप्रसंगी राष्ट्रवादी प्रवक्त्या प्रतिभा शिंदे, नंदुरबार जिल्हाध्यक्ष डॉ अभिजित मोरे, पॅनल प्रमुख योगेश चौधरी, गट नेते कल्पेश चौधरी आदीसह नगरसेवक उपस्थित होते.

> **● निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही**
>
> **याप्रसंगी राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पॅनल प्रमुख योगेश चौधरी व नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्षा भाग्यश्री चौधरी व नगरसेवकांचे त्यांच्या संपूर्ण टीमचे कौतुक करत, येणाऱ्या काळात तळोदा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कधीही निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असा विश्वास व्यक्त केला.**

# जिल्हा पोलिस दलातर्फे विशेष वाहन तपासणी मोहिमेत ११०६ वाहनांवर कारवाई

## ● १३.७१ लाख रुपयांचा दंड वसूल : पोलिस अधीक्षक रेड्डी

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यात वाढत्या रस्ते अपघातांवर नियंत्रण मिळवणे, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करणे तसेच गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्याच्या उद्देशाने जळगाव जिल्हा पोलीस दलातर्फे बुधवारी (दि. २४) संपूर्ण जिल्ह्यात ! 'विशेष वाहन चेकिंग मोहीम' राबविण्यात आली. या मोहिमेत ११०६ वाहनांवर धडक कारवाई करत १३ लाख ७१ हजार ४५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.**

पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्या आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व वाहतूक शाखांना कडक नाकाबंदी करून वाहन तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार शहरासह ग्रामीण भागात ठिकठिकाणी तपासणी पथके तैनात करण्यात आली होती. वाहनांची कागदपत्रे, नंबर प्लेट, चालक परवाने यांची सखोल तपासणी करण्यात आली.

या मोहिमेत विशेषतः विना नंबर प्लेट व फॅन्सी नंबर प्लेट असलेली वाहने तसेच अल्पवयीन वाहन चालकांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. नंबर प्लेट नसलेल्या अथवा नियमबाह्य नंबर प्लेट असलेल्या ४६३ वाहनांवर कारवाई करण्यात आली असून, त्यातून ४ लाख ४५ हजार रुपयांचा दंड वसूल झाला. तर वाहतूक नियमांचे उल्लंघन करून वाहन चालवणाऱ्या १०७ अल्पवयीन चालकांवर कारवाई करत ४ लाख ४ हजार ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला.

याशिवाय हेल्मेट न वापरणे, परवाना नसणे, सिट बेल्ट न लावणे, ओव्हरस्पीडिंग आदी इतर मोटार वाहन कायद्याअंतर्गत ५३६ वाहनांवर कारवाई करण्यात आली असून, त्यातून ५ लाख २१ हजार ९५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

या विशेष मोहिमेत जळगाव शहर वाहतूक शाखा, भुसावळ व चाळीसगाव शहर वाहतूक शाखांसह जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. अल्पवयीन मुलांच्या हाती वाहन देऊ नये, अन्यथा पालकांवरही कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिसांतर्फे देण्यात आला आहे. वाहतूक नियमांचे पालन करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

**जळगाव जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हा पोलीस दलातर्फे राबविण्यात आलेल्या व्यापक पोलिस कारवाईमुळे गुन्हेगारी प्रवृत्तींना चांगलाच धक्का बसला आहे. जिल्हाभरात एकाच वेळी राबविण्यात आलेल्या विशेष तपास व धडक कारवाईत विविध गुन्ह्यांतील आरोपींवर कारवाई करण्यात आली असून, अवैध व्यवसाय, वाहतूक नियमांचे उल्लंघन, तसेच समाजात असुरक्षिततेची भावना निर्माण करणाऱ्या घटकांवर पोलिसांनी कडक पावले उचलली आहेत.**

**जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार ही विशेष मोहीम राबविण्यात आली. शहर व ग्रामीण भागातील प्रमुख चौक, बाजारपेठा, महामार्ग, संवेदनशील परिसर तसेच गर्दीच्या ठिकाणी पोलिसांचे पथक तैनात करण्यात आले होते. . या कारवाईदरम्यान संशयित व्यक्तींची कसून तपासणी करण्यात आली. अनेक ठिकाणी वाहन तपासणी नाकाबंदी उभारून दुचाकी, चारचाकी वाहनांची कागदपत्रे तपासली गेली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. संपूर्ण जिल्ह्यात ! 'विशेष वाहन चेकिंग मोहीम' राबविण्यात आली. या मोहिमेत ११०६ वाहनांवर धडक कारवाई करत १३ लाख ७१ हजार ४५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.**

# केंद्रीय ओबीसी यादीत बडगुजर समाजाचा समावेश करावा



प्रतिनिधी । यावल

**बडगुजर समाजाला केंद्रीय ओबीसी यादीत समाविष्ट करून आरक्षणाचे लाभ मिळवून देण्यासाठी लोहारी येथील ङ्कचामुंडा माता मिशनफ्च्या शिष्टमंडळाने देशाची राजधानी दिल्लीत जोरदार मोर्चेबांधणी केली आहे. १७ ते १९ डिसेंबर दरम्यान या शिष्टमंडळाने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, नितीन गडकरी आणि मागासवर्ग आयोगाचे राष्ट्रीय अध्यक्ष हंसराज अहिर यांच्यासह अनेक बड्या नेत्यांची भेट घेऊन समाजाची कैफियत मांडली.**

**शिक्षणाचे आणि नोकरीचे नुकसान थांबवण्याची मागणी**

बडगुजर समाजाला सद्यस्थितीत केंद्रीय ओबीसी सवलती लागू नसल्याने समाजातील तरुण पिढीला उच्च शिक्षण आणि केंद्र सरकारच्या नोकऱ्यांपासून वंचित राहावे लागत आहे. या शैक्षणिक अन्यायाची माहिती शिष्टमंडळाने खासदारांच्या निदर्शनास आणून दिली. समाजाचा अंतिम अहवाल तातडीने केंद्रीय मंत्रिमंडळाच्या (कॅबिनेट) पटलावर मांडून राष्ट्रपतींच्या राजपत्रात (गॅझेट) त्याची नोंद व्हावी, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली.

या शिष्टमंडळात निवृत्त प्राचार्य पी.आर. बडगुजर, एस.एम. बडगुजर, संस्थापक अध्यक्ष नरेंद्र बडगुजर, अनंत बडगुजर आणि हिरामण बडगुजर यांचा समावेश होता. त्यांनी दिल्लीत सुप्रिया सुळे, शाहू महाराज छत्रपती, स्मिता वाघ, रक्षाताई खडसे आणि रामदास आठवले यांच्यासह विविध पक्षांच्या खासदारांची भेट घेतली. विशेषतः केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत डॉ. एन.डी. राऊत आणि श्रावण फरकांडे यांची झालेली चर्चा सकारात्मक ठरल्याने समाजाच्या आशा उंचावल्या आहेत.

आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागण्याचे संकेत यानिमित्ताने मिळाले आहेत.

## नगरदेवळा येथे कापूस खरेदी केंद्र सुरू करावे

**पाचोरा** । अतिवृष्टीमुळे अगोदरच संकटातून सावरता सावरता नाकीनऊ आलेला शेतकरी हा सरकारी नियमांमुळे पूर्ण घायाळ झाला आहे. अगोदर खरेदीची मर्यादा व आता कापसाची प्रत खराब म्हणून शेतकरींचा माल नाकारला जात आहे. एकिकडे अतिवृष्टी जाहीर करायची दुसरीकडे मात्र अतिवृष्टीमुळे खराब झालेला कापूस नाकारायचा. बघायला गेले तर जसा आहे तसा, हव तर १०:१ प्रमाण वापरून चांगला खराब अशी प्रतवारी करून कापूस खरेदी करता येवू शकतो. परंतू जर खरेदी करायचीच मानसिकता सरकारची नसेल तर मग न्याय कोणाकडे मागायचा? नगरदेवळा सह परिसरात सर्वाधिक कापूस पिकवला जातो. नगरदेवळा येथे शासकिय खरेदी केंद्र असणे आवश्यक आहे.

# सावदा येथील कृषिकन्यांच्या शीतकक्षावर शेतकऱ्यांना प्रात्यक्षिक

प्रतिनिधी । सावदा

**शीतकक्षाबाहेरील तापमानापेक्षा १०-१५ अंश थंड राहते आणि सुमारे ९० टक्के सापेक्ष आर्द्रता राखता येते. ज्याने ताजी फळे, भाज्या आणि फुले यांची विक्रीक्षमता वाढवते. शेतकऱ्यांना शून्य ऊर्जेवर शीतकक्ष उभारणीची माहिती यावेळी देण्यात आली.**

शेतकऱ्यांनी पिकवलेला कृषी माल नाशवंत असल्यामुळे त्याची त्वरित विक्री न झाल्यास खराब होतो. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. शेतकऱ्यांचे हे नुकसान लक्षात घेऊन जळगाव येथील डॉ. उल्हास पाटील कृषी महाविद्यालयाच्या कृषिकन्यांनी (सावदा, ता. रावेर) येथील शेतकऱ्यांना शून्य ऊर्जेवर आधारीत शीतकक्षाची प्रात्यक्षिकासह उभारणी करून माहिती दिली.



ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनी नेहा बाविस्कर, गौरी भोसले, नेहा खोडपे, सुजाता काळे, माधुरी सपकाळे यांनी सावदा येथे ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत शून्य ऊर्जेवर आधारीत शीतकक्ष उभारला. पूर्वीच्या काळात फ्रीज, कोल्ड स्टोरेज नसताना शेतकरी या शून्य उर्जेवर आधारित शीतकक्षांचा मोठ्या प्रमाणात वापर करायचे. आजही ग्रामीण भागात अनेकदा वीज नसते. अशा ठिकाणी या तंत्रज्ञानाचा वापर केल्यास शेतकऱ्यांच्या शेतमालाचे साठवणूक कालावधी वाढून त्यांचे आर्थिक नुकसान टाळता येईल. या कार्यानुभवसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शैलेश तायडे, कार्यक्रम समन्वयक प्रा. बी. एम. गोणशेटवाड, कार्यक्रम अधिकारी डॉ.मोनिका भावसार आणि विषयाचे विशेष तज्ज्ञ प्रा.संदीप पाऊलझगडे यांनी कृषिकन्यांना मार्गदर्शन केले. यावेळी संतोष भंगाळे, किशोर देवकर, विठ्ठल चौधरी, भागवत पाटील, सौरभ नेमाडे, प्रिती चौधरी, प्रभावती कोळंबे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# ट्रॅक्टर उलटल्याने पित्यासह ७ वर्षीय चिमुकल्याचा मृत्यू

प्रतिनिधी । भुसावळ

**तालुक्यातील किन्ही वेल्हाळे शिवारात ट्रॅक्टर उलटून झालेल्या भीषण अपघातात पिता आणि त्यांच्या सात वर्षीय चिमुकल्याचा जागीच मृत्यू झाला आहे. ही घटना बुधवार, २४ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास ही दुर्घटना घडली. या घटनेमुळे वरणगावच्या सिद्धेश्वर नगर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.**

वरणगाव येथील सिद्धेश्वर नगरमधील रहिवासी आणि ट्रॅक्टर चालक संजय श्रावण साबळे (वय ४०) हे त्यांच्या ट्रॅक्टरने किन्ही शिवारातील गिट्टी मशीनवर 'कच' आणण्यासाठी जात होते. त्यांच्यासोबत त्यांचा ७ वर्षांचा मुलगा भूषण संजय साबळे आणि अक्षय संतोष मोरे (वय-२४) हा मजूर देखील होता. प्रवास सुरू असताना अचानक ट्रॅक्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाला आणि चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रॅक्टर रस्त्यावरच उलटला. अपघात इतका भीषण होता की, ट्रॅक्टरखाली दाबले गेल्याने चालक संजय साबळे आणि त्यांचा मुलगा भूषण या दोघांचाही जागीच मृत्यू झाला. या अपघातात ट्रॅक्टरवरील मजूर अक्षय मोरे हा गंभीर जखमी झाला असून, त्याला उपचारासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलवण्यात आले आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत सायकलस्वार ठार

**रावेर ।** ऐनपूर येथून चिवडा विक्री करून सायकलवर परत येत असताना महामार्गावरील अजंदे फाट्यावर अज्ञात वाहनाने धडक दिल्याने अनिल जवाहरलाल मिश्रा (५५. रा. भोर स्टेशन) यांचा मृत्यू झाला. ही घटना दि.२० रोजी रात्री १० वाजता घडली. मयताच्या नातेवाइकांनी दोन दिवस उशिराने याबाबत रावेर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

याप्रकरणी रावेर पोलिसांत अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघातानंतर मिश्रा हे घटनास्थळी पडून होते. त्यांना इतर वाहनचालकांनी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. त्यामुळे अकस्मात मृत्यूची नोंद झाली होती.

## धरणगावात थंडीचा जोर कायम; दिवसा देखील हुडहुडी

प्रतिनिधी । धरणगाव

**शहरासह तालुक्यातील आनोरे, धानोरे, गारखेडे, पिंप्री, वाघळुद शिवारासह संपूर्ण तालुक्यात थंडीचा जोर कायम असून दिवसा देखील हुडहुडी भरू लागली आहे. गेल्या वर्षापेक्षा यावर्षी थंडीचा प्रभाव जास्त आहे. दरम्यान, पाटाचे आवर्तन सुरू झाल्यामुळे थंडीचा जोर आणखी वाढण्याची शक्यता आहे.**

यंदा तालुक्यात पावसाळा शंभर टक्यापेक्षा अधिक झाल्यामुळे वातावरणात आद्रता अधिक आहे. त्यामुळे पुढील महिन्यात देखील थंडीचा जोर कायम राहणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, रब्बीच्या पिकांसाठी थंडी पोषक ठरत आहे. अधिक थंडीमुळे शेकोट्या पेटू लागल्या असून उबदार कपडयांची खरेदीकडे नागरिकांचा कल आहे. दिवसा भारनियमन होत असल्याने शेतकरी वर्गाला मात्र रात्री देखील हुडहुडीमध्ये पिकांना पाणी पुरवठा करण्यासाठी जावे लागत आहे. त्यामुळे शेतकरींच्या आरोग्यावर देखील परिणाम होत आहे. अधिक थंड वातावरणाचा प्रभाव पिकांवर दिसून येत आहे. काही पिकांवर थंडीमुळे अळींचा प्रभाव जाणवू लागला आहे.



# अमळनेर येथील वकिलास फोनवरून जीवे मारण्याची धमकी

## ● प्रांतांना निवेदन : वकील संरक्षण कायद्याची अंमलबजावणी करण्याची मागणी

प्रतिनिधी । अमळनेर

**येथील वकील ॲड. मंगेश देविदास पाटील यांना एका कायदेशीर नोटीस प्रकरणात फोनवरून जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याची तक्रार दाखल झाली आहे. या प्रकरणी अमळनेर वकील संघाने तीव्र निषेध नोंदवित वकील संरक्षण कायद्याची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे.**



येथील वकील ॲड. मंगेश देविदास पाटील यांना एका कायदेशीर नोटीस प्रकरणात फोनवरून जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याची तक्रार दाखल झाली आहे. या प्रकरणी अमळनेर वकील संघाने तीव्र निषेध नोंदवित वकील संरक्षण कायद्याची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. अमळनेर वकील संघाचे सदस्य असलेले ॲड.मंगेश पाटील यांनी एका प्रकरणात कायदेशीर नोटीस बजावली होती. त्यानंतर दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी सुमारे २.४७ वाजता प्रदीप राज कुलकर्णी (रा. शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे) यांनी ॲड. पाटील यांना फोन करून अरेरावीची भाषा वापरत जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

ॲड.पाटील हे त्यावेळी न्यायालयात कामकाज करत होते, असेही तक्रारीत नमूद आहे. या प्रकारानंतर ॲड. मंगेश पाटील यांनी पोलिसांकडे तक्रार दिली असून, या प्रकरणी अमळनेर पोलीस स्टेशनला तक्रार दाखल करण्यात आली आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर अमळनेर वकील संघाने दि. २४ डिसेंबर २०२५ रोजी तातडीची बैठक घेऊन घटनेचा तीव्र शब्दांत निषेध केला. अशा प्रकारच्या धमक्यांमुळे वकिलांना निर्भयपणे आपले कर्तव्य पार पाडणे कठीण होत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# अजिंठा घाटात ट्रक नादुरुस्त; दोन तास 'चक्काजाम',

प्रतिनिधी । फर्दापूर

**अजिंठा घाटात आज दुपारी एक अवजड ट्रक अचानक नादुरुस्त झाल्यामुळे वाहतुकीचा मोठा खोळंबा झाला. तब्बल दोन तास चाललेल्या या वाहतूक कोंडीमुळे घाटाच्या दोन्ही बाजूंना सुमारे ४ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. विशेष म्हणजे, या गंभीर परिस्थितीत एकही वाहतूक पोलीस घटनास्थळी फिरकला नसल्याने प्रवाशांनी तीव्र संताप व्यक्त केला.**



अजिंठा घाटातील एका वळणावर चढत असताना एका ट्रकचे इंजिन निकामी झाले. घाटातील रस्ता अरुंद असल्याने मागून येणाऱ्या वाहनांना पुढे जाण्यास जागा उरली नाही. अवघ्या काही मिनिटांतच घाटातील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. बस, खाजगी वाहने आणि मालवाहू ट्रक अडकून पडल्याने प्रवाशांना भर उन्हात ताटकळत राहावे लागले. दोन तास उलटूनही वाहतूक पोलीस मदतीला न आल्याने अखेर वाहनधारकांनीच पुढाकार घेतला. अनेक चालकांनी आपल्या वाहनातून खाली उतरून वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न केला. अजिंठा घाटात नेहमीच चकक्का जाम होत असते. शासनाने रस्ता ररुंदीकरण केल्यास एकादे वाहन नादुरुस्त झाले तर संपूर्ण रसता बंदचे प्रकार होणार नाहीत.

**● प्रवाशांचे हाल आणि प्रशासनाचे दुर्लक्ष**

**'महत्त्वाचा महामार्ग असूनही अशा वेळी मदतीला पोलीस का नसतात?फ्फ असा संतप्त सवाल प्रवाशांनी उपस्थित केला आहे. घाटात वारंवार होणाऱ्या अशा बिघाडांमुळे आणि नियोजनाच्या अभावामुळे अजिंठा घाट आता प्रवाशांसाठी डोकेदुखी ठरू लागला आहे. उशिरापर्यंत वाहतूक धिम्या गतीने सुरू होती.**

## दुचाकीच्या डिक्कीत धारदार शस्त्र घेवून फिरणारे दोघे ताब्यात

प्रतिनिधी । जळगाव

**एमआयडीसी पोलिसांनी दुचाकीच्या डिक्कीत धारदार चाकू घेवून फिरणाऱ्या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून धारदार चाकू हस्तगत करण्यात आले. ही कारवाई मंगळवारी पहाटे ४ वाजेच्या सुमारास सिंधी कॉलनी परिसरातील सेवा मंडळ परिसरात केली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

शहरातील सिंधी कॉलनी परिसरातून दि. २३ रोजी पहाटेच्या सुमारास संशयित जवान अहदम सईद शेख (वय २६, रा. बुशरा हॉटेल गरीब नवाझ नगर, धुळे) व साकीर अन्वर खाटीक (वय ४४, रा. हजार खोली मुस्लिम नगर, धुळे) हे दोघ (जीजे ०५, जेके, ७८९८) क्रमांकाच्या दुचाकीने जात होते. यावेळी पोलिसांनी त्यांच्या वाहनाची झडाझडती घेतली असता, त्यांच्या दुचाकीच्या डिक्कीतून धारदार चाकू हस्तगत करण्यात आला.

याप्रकरणी पोलीस कर्मचारी विशाल कोळी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दोघ संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल रामकृष्ण पाटील हे करीत आहे.